सामान्य प्रशासन (ग्रामपंचायत) विभाग
Email-dyceo.vposmanabad@gmail.com
Phone No 02472223343/Fax No – 223377

आझादी का अमृत महोत्सव

जा.क्र./जिपऊ/साप्रवि-२/राग्रास्वअ/लेखापाल/कावि/ 340 /२०२३

दि. 20/2/२०२३

## प्रसिद्धीपत्रक

यापत्राद्वारे कळविण्यात येते की, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत सिंधुदुर्ग जिल्हयातील ग्रा.पं.कुशेवाडा ता.वेंगुर्ला, ग्रा.पं. परूळेबाजार ता.वेंगुर्ला, ग्रा.प. भोगवे ता.वेंगुर्ला, ग्रा.पं.वायरी ता.मालवण, ग्रा.पं. देवबाग ता.मालवण, ग्रा.पं. विजयदुर्ग ता.देवगड जि.सिंधुदूर्ग या ग्रामपंचायतींना भेट देणेकामी राज्यांतर्गत अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला असून सदर दौऱ्याच्या कालावधीत प्रवास खर्च, अलपोपहार, चहा २ वेळा , दुपारचे जेवण, रात्रीचे जेवण, पिण्याचे पाणी, मुक्काम इ. बाबींसाठी पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागविणेत येत आहेत. उक्त अभ्यास दौरा जिल्हा परीषद उस्मानाबाद मुख्यालय ते उक्त नमुद ग्रामपंचायतींच्या भेटीच्या ठिकाणे ते परत जिल्हा परिषद उस्मानाबाद मुख्यालय असा आहे.

| अ.क्र. | तपशील | सहभागींची संख्या |
|---|---|---|
| १ | प्रवास खर्च, अलपोपहार, चहा २ वेळा , दुपारचे जेवण, रात्रीचे जेवण, पिण्याचे पाणी, मुक्काम इ. | 44 |

पुरवठाधारकाने आपले दरपत्रके दि.21/2/२०२३ ते 27/2/२०२३ या कालावधीत कार्यालयीन वेळ संपण्यापूर्वी ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद येथे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) यांचे नावे सिलबंद दरपत्रके (तांत्रिक व दराचा स्वतंत्र लिफाफा त्यावर तसे नमूद करून) सोबतच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून सादर करावीत व दिनांक28/02/२०२३ रोजी दुपारी ०४.०० वाजता दरपत्रके उघडण्यात येतील त्यादिवशी पुरवठाधारकांनी उपस्थित राहावे. याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

सोबत अटी व शर्ती:-

(राहुल गुप्ता भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

## राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान राज्यांतर्गत उस्मानाबाद ते सिंधुदुर्ग जिल्हयातील ग्रा.पं. अभ्यास दौऱ्यासाठी अटी व शर्ती :-

1. राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत जिल्हा परिषद उस्मानाबाद कडील पदाधिकारी व अधिकारी/कर्मचारी यांना राज्यांतर्गत दौऱ्यासाठी उस्मानाबाद ते सिंधुदुर्ग जिल्हयातील ग्रा.पं.कुशेवाडा ता.वेंगुर्ला, ग्रा.पं. परूळेबाजार ता.वेंगुर्ला, ग्रा.प. भोगवे ता.वेंगुर्ला, ग्रा.पं.वायरी ता.मालवण, ग्रा.पं. देवबाग ता.मालवण, ग्रा.पं. विजयदुर्ग ता.देवगड जि.सिंधुदूर्ग या ग्राम पंचायतींना साधारण ५ दिवसासाठी भेट देण्यासाठी प्रवास खर्च, अल्पोपहार, चहा २ वेळा , दुपारचे जेवण, रात्रीचे जेवण, पिण्याचे पाणी, मुक्काम इ. बाबीसाठी लागू राहतील.
2. मुक्कामाकरिता स्वच्छता व सुविधा असलेली खोली आवश्यक आहे.
3. प्रवासाचे वाहने हे वातानुकुलित बैठक व्यवस्था असलेले आवश्यक आहे.
4. प्रवासाचे वाहने हे सुस्थितीत असावे व संस्थचे नोंदणी केलेले सर्व्हिस टॅक्स नोंदणी प्रमाणपत्र व टॅक्सी परमिट असलेले वाहन आवश्यक आहे.
5. वाहनाची सर्व कागदपत्रे टॅक्सी परमिट, वाहन चालक परवाना, वाहनाचा विमा, वाहनाचे आर.सी बुक, पी.यु.सी. इत्यादी अद्यावत असणे आवश्यक आहे.
6. ट्रॅव्हलींग एजन्सी/फर्मची नोंदणी असणे आवश्यक आहे.
7. वाहन केवळ मालकाच्या अकार्यक्षमतेमुळे बंद झाल्यास पर्यायी व्यवस्था करण्याची जबाबदारी संबंधित ट्रॅव्हलींग एजन्सी/फर्मची राहिल.
8. वाहनाची किरकोळ किंवा मोठी दुरूस्ती करण्याच्या काळात पर्यायी वाहन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी एजन्सीची राहिल.
9. पुरवठादाराने सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे बंधपत्र रू.५०० किमतीच्या स्टॅंप पेपरवर लेखी स्वरूपात स्वाक्षरीत करून देणे बंधनकारक आहे.
10. वाहन कार्यालयाच्या वापरात असताना अपघात झाल्यास जिवित अथवा वित्त हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी व कायदेशीर दायित्व फक्त वाहन पुरवठादार व वाहन मालकावर व वाहन चालक यांचेवरच फक्त असेल.
11. वाहनाचा प्रवासी विमा (थर्ड पार्टी इन्शुरन्स) चे कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे.
12. उपरोक्त कंत्राट कोणत्याही कारणाशिवाय रद्द करण्याच अधिकारी जिल्हा परिषदेने राखून ठेवला आहे.
13. देयकाची अदायी सर्व नियमांच्या अधिन राहून सर्व प्रकारच्या करासहित कपात करून केली जाईल.
14. सेवा पुरवठाधारकाने निविदेतील अटी व शर्तींचा भंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यावर दंडाची तरतूद करण्यात येईल.
15. जेवण हे महाराष्ट्रीयन पद्धतीचे (फुल जेवण चपाती/भाकरी, दाळ, जिरा राईस, दोन भाज्या,पापड,लोणचे,स्वीट इत्यादी) असावे.
16. मंजूर दरपत्रकाचे दर हे न्युनतम असलेतरी त्यामध्ये तडजोड करून मंजूर दर ठरविण्याचा अधिकारी जिल्हा परिषदेस राहिल.
17. नमुद केलेले दर हे कराराचे पूर्ण कालावधीसाठी कायम राहतील व कोणत्याही सबबीखाली मंजूर दरात वाढ केली जाणार नाही .

(राहुल गुप्ता भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद, उस्मानाबाद